# आकाशवाणी पुणे

## प्रादेशिक वृत्त विभाग

## पुणे वृत्तांत

## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.03.2025** **वार- शुक्रवार**

---

**नमस्ते योजना**

देशातील कचरावेचकांना सामाजिक आणि आर्थिक सन्मान मिळावा आणि त्यांचे जीवनमान उंचावे, त्यांना सुरक्षित रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने केंद्र सरकार नमस्ते योजना राबवत आहे. याच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात पुण्यापासून करण्यात आली आहे. या योजनेद्वारे कचरा वेचकांना अधिकृत नोंदणी आणि सामाजिक सुरक्षा योजनेचे फायदे मिळतील. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बीपी यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळामार्फत या योजनेची अंमलबजावणी सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं.

**क्षयरोगमुक्त भारत**

राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पुण्यात महापालिकेतर्फे राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन अभियान राबवलं जात आहे. यामध्ये सहभागासाठी 66 जणांनी निक्षय मित्र म्हणून नोंदणी केल्याची माहिती महापालिकेचे क्षयरोग अधिकारी डॉक्टर प्रशांत बोथे यांनी दिली. पुणे महापालिका हद्दीत गेल्या वर्षी 7981 नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली आहे.2025 पूर्वी क्षयरोगाचं उच्चाटन करण्याचं केंद्र सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी महापालिकेतर्फे जास्तीत जास्त संशयित रुग्णांची तपासणी करून क्षयरुग्ण निदान करणे आणि नियमित उपचारांबाबत पाठपुरावा करून क्षय रुग्णाला पूर्ण बरे करणे, हे काम केलं जात आहे.

**विद्यार्थ्यांची इस्रो भेट**

पुणे जिल्हा परिषदेतील 25 विद्यार्थी नासाला तर 40 विद्यार्थी इस्रोला भेट देणार आहेत. ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्तीचा विकास व्हावा यासाठी जिल्हा परिषदेने हा निर्णय घेतला आहे. या विद्यार्थ्यांची निवड आयुकाच्या सहकार्यानं निवड परीक्षेद्वारे केली जाणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी ही माहिती दिली.

**वीज बिल भरणा**

चालू आर्थिक वर्षाचे अखेरचे तीन दिवस सुटीचे असले तरीही पुणे मंडलातील महावितरणची सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्रं या सुटीच्या दिवशीदेखील सुरू ठेवण्याचा निर्णय महावितरणनं घेतला आहे. ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांना चालू तसंच थकित वीजबिल मुदतीत भरता यावे यासाठी हा निर्णय घेतल्याचं महावितरणनं म्हटलं आहे. थकबाकीसाठी वीजपुरवठा खंडित केला जात असून, वीज पुरवठा पुन्हा जोडण्यासाठी ग्राहकांना थकबाकीसह पुनर्जोडणी शुल्क जीएसटीसह भरावं लागणार आहे.

**नाट्यसंगीत महोत्सव**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे बालगंधर्व संगीत रसिक मंडळाच्या पुढाकारानं पुण्यात आजपासून तीन दिवसांचा नाट्यसंगीत महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या विनाशुल्क महोत्सवाचं उद्घाटन सनदी लेखापाल विजयकांत कुलकर्णी, ज्येष्ठ संगीत नाट्यकर्मी, नाट्य अभ्यासक सुरेश साखवळकर आणि ज्येष्ठ तबलावादक पांडुरंग मुखडे यांच्या हस्ते होणार आहे. शनिवार आणि रविवारी भरत नाट्य मंदिरात तर सोमवारी तळेगाव दाभाडे इथल्या कलापिनी नाट्यगृहात होणाऱ्या या महोत्सवात अनेक नामवंत कलाकार सहभागी होणार आहेत.

**रेल्वे**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं काही विशेष गाड्या 30 एप्रिल पर्यंत चालवण्याचा निर्णय घेतला आहे. सोलापूर दौंड सोलापूर, कोल्हापूर पुणे कोल्हापूर, पुणे हरंगुल पुणे या साप्ताहिक विशेष गाड्यांचा कालावधी वाढवण्यात आल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

**पिंपरी चिंचवड मनपा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं मालमत्ता कर संकलनामध्ये वाढ होण्यासाठी राबवलेल्या उपाययोजनांची दखल राज्य सरकारनं घेतली आहे. महानगरपालिकेला राज्य सरकारच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

**मालमत्ताकर थकबाकी इशारा**

मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील467 मालमत्ताधारकांच्या मालमत्तांचा येत्या सोमवारी लाव करण्यात येणार आहे. यापैकी 2 लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांनी एकूण रकमेच्या 50 टक्के थकबाकी जमा केल्यास त्यांची मालमत्ता लिलाव प्रक्रियेतून वगळून सीलमुक्त करण्यात येईल असं कर संकलन विभागानं कळवलं आहे.

**दिव्यांग क्रीडा स्पर्धा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि साई संस्कार संस्था यांनी महापालिका परिसरातील मतिमंद आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचं आयोजन केलं आहे. उप आयुक्त पंकज पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन झालं. या स्पर्धेत नितीन खरात, संस्कार फलके, देविदास पारधी, प्रथमेश जाधव यांनी दृष्टीहिनांच्या धावण्याच्या शर्यतीत, सॉफ्टबॉल थ्रो प्रकारात यश कदम यानं तर 50 मीटर धावणे प्रकारात अर्णव बोरुडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 39 अंश तर किमान तापमान 18 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा फरक संभवत नाही. उद्या आकाश निरभ्र असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**